# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## येशूचा बाप्तिस्मा रविवार - १२ जानेवारी २०२०

### श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** ः बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. अखिल मानव जातीवरील परमेश्वराच्या प्रेमावर विश्वास ठेवून आपण आपल्या प्रार्थना त्याच्या चरणी अर्पण करू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स मच्याडो, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना येशूच्या बाप्तिस्मा साक्रामेंताचे महत्व भाविकांना श्रद्धेने देण्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. सर्व राजकीय नेत्यांना देशाच्या कल्याणासाठी कार्यरत राहण्यास प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. बाप्तिस्मा साक्रामेंत ख्रिस्तसभेचे प्रवेशद्वार आहे. ह्या साक्रामेंताद्वारे पवित्र आत्म्याची दानं आणि फळं भाविकांना मिळत असतात. ह्या दानांचा योग्य तो वापर श्रद्धावंतानी करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. येशूचा बाप्तिस्मा योहानाने केला. येशू आपला बाप्तिस्मा पाणी आणि पवित्र आत्म्याने करतो. बाप्तिस्मा घेतलेल्या आपल्या सर्वांना ख्रिस्ताची सुवार्ता पसरविण्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या कृपेने आपल्याला चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उदया / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा व विवाह संस्काराचे महत्व त्यांना कळावे म्हणून आपण प्रार्थना करू या

थोडा वेळ शांत राहून आपण वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. **आमेन.**